विविध माध्यमांद्वारे शासकीय संदेशाचे प्रसारण व स्पर्धांच्या आयोजनाच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मावज-२०१९/प्र.क्र.१४०/का-३४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० जून, २०१९

वाचा: १) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्तचित्र-२०१९/वि.प्र.मो./का-७/५८, दिनांक २१ मे, २०१९
२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्तचित्र-२०१९-२०/वि.प्र.मो./का-७/१६७, दिनांक १९ जून, २०१९

प्रस्तावना-

राज्य शासनाकडून जनकल्याणाच्या विविध योजना, ध्येय-धोरणे, महत्त्वकांक्षी प्रकल्प, विकास कामे व लोककल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांची सर्व सामान्य जनतेला माहिती होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिध्दीच्या विविध योजना/मोहीमा राबविल्या जातात. या योजनांपैकी 'विशेष प्रसिद्धी मोहीम' ही एक योजना आहे. सदर योजनेसाठी सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीमधून लघुचित्रपट व छायाचित्र स्पर्धेचे आयोजन, समाज माध्यमांद्वारे प्रसिध्दी, व शासनाच्या विविध योजनांची माहिती पुस्तिका इत्यादीद्वारे शासकीय संदेश प्रसारण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

सन २०१९-२० या वर्षासाठी **रु.१,६४,५९,०००/- (रुपये एक कोटी चौसष्ट लाख एकोणसाठ हजार फक्त)** इतक्या रकमेच्या खालील बाबींवरील खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

क्र.	बाब	खर्चाचा तपशिल	एकूण खर्च
१.	**लघुचित्रपट व छायाचित्र स्पर्धेचे आयोजन**	विविध महत्वाच्या योजनांवर आधारित “महाराष्ट्र माझा, शेतकरी राजा” लघुचित्रपट स्पर्धा २०१६, २०१७ व २०१८ तसेच “महाराष्ट्र माझा, छायाचित्र स्पर्धा” २०१७ व २०१८ या स्पर्धेतील पुरस्कार प्रदान करणे	रु.४,५९,०००/-
२.	**समाज माध्यमावरुन प्रसिद्धी**	१. सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवरुन शासकीय संदेशांचे प्रसारण २. एसएमएस पॅकेज खरेदी ३. जाहिरात वितरण/ वृत्तपत्र यादी/ पत्रकार कल्याण योजना इत्यादींसाठी आज्ञावली /अपडेशन	रु.८५,००,०००/-
३.	**अन्य माध्यमे**	रेल्वेमध्ये भित्तीपत्रके/ एस.टी.स्टँडमध्ये ऑडिओ, आदी माध्यमांद्वारे शासकीय संदेशांचे शासकीय दरानुसार प्रसारण	रु.५०,००,०००/-
४.	**प्रकाशने**	शासनाच्या विविध योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तिका निर्मिती	रु.२५,००,०००/-
		एकूण	**रु.१,६४,५९,०००/-**

२. उपरोक्त खर्च करताना आवश्यक असेल आणि योग्य अशा बाबींवर तसेच कमीत कमी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी. सदर खर्च करताना शासनाचे निर्णय / परिपत्रक / वित्तीय नियमावलीतील तरतुदी इत्यादींचे पालन करावे व विहित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

३. प्रस्तुतचा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.-ए-६-२२२०-माहिती व प्रसिध्दी, ६० इतर, १०१ जाहिरात व दृक प्रसिध्दी (००) (०३) शासकीय योजनांची विशेष प्रसिध्दी मोहीम (योजनांतर्गत), २६ जाहिरात व प्रसिध्दी (संगणक सांकेतांक क्र.२२२०११७५) लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० मधील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८८/२०१९/१४४३, दि.४/६/२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०३/२०१९/व्यय-४, दि.१०/०६/२०१९ अन्वये त्यांच्या प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०६२०१६५९५०४१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.06.25 13:33:11 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

प्रत,

१) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद/ महाराष्ट्र विधानसभा, मुंबई
२) सर्व सन्माननीय सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद/ महाराष्ट्र विधानसभा, मुंबई
३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सचिव (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५) महासंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुश्रेयता), मुंबई/ नागपूर,
७) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
८) सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
९) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१३) सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१४) सर्व उप माहिती कार्यालये, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,

१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६) लेखाधिकारी (आहरणा व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१७) नियोजन विभाग / (का-१४४३), मंत्रालय, मुंबई
१८) वित्त विभाग / (व्यय-४), मंत्रालय, मुंबई
१९) निवड नस्ती.